ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

Volume–X, Issues–II March - April 2021

# भारतातील प्रौढ शिक्षणाचा आढावा

**अभिषेक आनंदराव वाघ**

**प्रास्ताविक :**

सन १९७८ च्या राष्ट्रीय प्रौढ शिक्षणाचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, सन १९७८ च्या राष्ट्रीय प्रौढ शिक्षणात जो विचार मांडण्यात आलेला आहे, त्यात आतापर्यंत केलेल्या प्रौढ शिक्षणाच्या कार्यात ज्या अडचणींचा सामना करावा लागला, ज्या ज्या उणीवा जाणवल्या त्या सर्व काढून टाकून ते अधिक निर्दोष व आधुनिक बनविण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या धोरणामध्ये ख-या अर्थाने प्रौढ शिक्षणाच्या कार्याला गति मिळाली असल्याचे दिसून येते.तसेच हा प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम देशाच्या विकासाच्या कार्यक्रमाशी जोडण्यात आलेला आहे. या कार्यक्रमात साक्षरता, जाणीव जागृती व कार्यात्मकता या त्रिसुत्रीवर प्रामुख्याने भर देण्यात आलेला आहे.

Aarhat Publication & Aarhat Journalsis licensed Based on a work at http://www.aarhat.com/eiirj/

अशाच प्रकारे भारतात प्रौढ शिक्षणाची कार्यस्तिथी होती. त्याचा अभ्यास या संशोधन लेखात करण्यात आलेला आहे. तो विशिष्ट कालखंडानुसार तसेच विविध प्रांतानुसार सुद्धा मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**१) प्राचीन काळातील प्रौढ शिक्षणाची स्तिथी :**

प्राचीनकाली विद्येला खुपच महत्व होते. विद्याविहीन व्यक्तीला समजामध्ये पशुमान दर्जा होता. अशावेळी सुद्धा तरी देखील अशा वेळी सुद्धा प्रौढांना शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली होती. प्राचीन काळी प्रौढ शिक्षण घराघरातून चालत असे. कुटुंबातील किंवा समाजातील निरक्षर व्यक्तीला त्याच कुटुंबातील किंवा समाजातील व्यक्ती शिकवत असे. त्यांच्या शिक्षणात प्रामुख्याने अक्षरज्ञान, प्रारंभिक गणित, भूगोल, इतिहास, धर्म, पुराण, संस्कृती इत्यादी विषयांचा समावेश करण्यात आलेला होता. हे शिक्षण चालू असताना व्यक्तीला त्याबरोबर घरात चाललेल्या व्यवसायाचे शिक्षण दिले जाई. तसेच सर्व शिक्षण हे मौखिक पद्धतीने दिले जाई आणि प्रामुख्याने पाठांतरावर अधिक भर असे.

**२) मध्ययुगीन काळातील प्रौढ शिक्षण :**

मध्ययुगीन काळात आपल्या देशात मुसलमानांचे आक्रमण झाले, खरेतर देशात शांतता आणि सुव्यवस्था आता हाच महत्त्वाचा प्रश्न बनला, त्यामुळे शिक्षणाचा प्रश्न मागे राहिला. परंतु त्या काळातही भारतीय परंपरेनुसार घराघरातून, मंदिर-मठातून, विहारातून शिक्षण मोठ्या प्रमाणात दिले जात असे. तेथे धर्मगुरु शिकवीत असत.

**३) एकोणिसाव्या शतकातील प्रौढ शिक्षण :**

आधुनिक काळात प्रौढ शिक्षणाचे काम अनेक व्यक्तींनी व प्रौढ शिक्षण देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या संस्थांनी दिले. इ.स. १८५५ मध्ये महात्मा फुले यांनी पुण्याला आपल्या घरी प्रौढ स्त्री-पुरुषांना

शिकविण्याचा वर्ग काढून त्यांना स्वतः महात्मा फुले व व त्यांच्या सुविद्य पत्नी सावित्रीबाई फुले या शिकवत असत. महात्मा फुले यांनी स्त्रियांसाठी पहिली रात्र शाळा सुरू केली. शेतात काम करणाऱ्या निरक्षर प्रौढ व्यक्तीला त्यांच्या दुपारच्या विश्रांतीच्या वेळी शेतात जाऊन शिकविले जात असे. त्यासाठी त्यावेळी जमिनीची पाटी व हाताच्या बोटांची देखणी केली परंतु लोकांना लिहिणे वाचणे शिकवले.

**४) बंगाल प्रांतातील प्रौढ शिक्षण :**

बंगाल प्रांतात चांगल्याप्रकारे चालणाऱ्या प्राथमिक शाळांनाच रात्रीचे प्रौढांचे वर्ग जोडले जात असत. कलकत्ता येथे एका कारखान्यात प्रौढ शिक्षणाचा वर्ग चालविण्यात येत असे. यामध्ये फॅक्टरीत काम करणारी मुले शिकण्यासाठी येत असत. त्यांना प्रामुख्याने काम धंद्यातील शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, लेखन, वाचन, गणित शिकविले जात असे.

**५) पंजाब मधील प्रौढ शिक्षण :**

इ.स.१९२० साली पंजाबात गुरगाव येथे इंग्रज शासकीय अधिकारी बेन यांनी प्रौढ शिक्षणात महत्त्वाचे काम केले. केवळ साक्षरता मिळविण्यात प्रौढ रस घेत नाहीत, म्हणून साक्षरते बरोबरच शेती, विकास, आरोग्य आणि तत्सम विषय शिकवले तर ते शिक्षणात रस घेतील, असे समजून त्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

**६) आंध्र प्रदेश मधील प्रौढ शिक्षण :**

आंध्रप्रदेशात 'हेडमपल्ली मुंडम' या खेडेगावी 'खेडे सुधार शाळा' उपक्रम चालविण्यात येत असे. या शाळेतर्फे प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात येत असे. इ.स. १९३३ मध्ये 'रामनाडू' या आदर्श संस्थेने प्रौढ शिक्षणाचे जे कार्य सुरू केले. संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या प्रौढ शिक्षण वर्गात समाजशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी विषयावर उपयुक्त ज्ञान दिले जात असे. याप्रमाणे भारतातील प्रशिक्षणाचा आढावा घेण्यात आलेला आहे

**७) भारतातील १ ते ७ पंचवार्षिक योजना व प्रौढ शिक्षण :**

**१. पहिली पंचवार्षिक योजना (१९५१ ते १९५६) :**

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात प्रौढ शिक्षणाची जबाबदारी केंद्र व राज्य या दोन्ही सरकारवर सोपविण्यात आली. त्या त्या सरकारातील शिक्षण खाते व समाज कल्याण खाते प्रशिक्षणाची जबाबदारी सांभाळत असत. पहिल्या पंचवार्षिक योजनेत एकूण प्रौढ शिक्षणासाठी पाच कोटी रुपयांची तरतूद केली होती.

**२. दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६ ते १९६१):**

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी प्रौढ शिक्षणासाठी एकूण पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. तसेच प्रौढ शिक्षणाचा विकास कार्यक्रम म्हणून प्रौढ शिक्षणासाठी इतर मार्गांनी आणखी दहा कोटी रुपये मिळावेत अशी योजना केली होती.

**३. तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१ ते १९६६) :**

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कार्यकाळात पंचायत राज्याच्या कार्यालयाच्या प्रयोगाला सुरुवात झालेली होती. ग्रामपंचायतीला जास्त महत्त्व प्राप्त झाले आणि त्यामुळे गावात लोकांना लिहिणे, वाचन करणे जरुरीचे झाले. गावातील पुढाऱ्यांना, शिक्षकांना, निरनिराळ्या कार्यकर्त्यांना शिक्षणाच्या कार्यात गुंतवून ठेवणे आणि प्रौढ

शिक्षणाची मोहीम लोकप्रिय करणे हे उद्दिष्ट या योजनेत स्वीकारले गेले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत एकूण २५ कोटी रुपयांची तरतूद केली होती.

**४. चौथी पंचवार्षिक योजना (१९६७ ते १९७२) :**

चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात जनतेचा सहभाग प्रौढ शिक्षणाच्या मोहिमेत वाढावा यावर लक्ष दिले गेले. साक्षरतेमध्ये कार्यात्मक साक्षरतेच्या संकल्पनेचा समावेश करण्यात आला. कार्यात्मक साक्षरता लोकांच्या कामधंदे व जीवनाशी संबंधित होती व त्यातून व्यक्तीची विकास करण्याची शक्ती, बुद्धी जोपासायला हवी अशी दृष्टी ठेवण्यात आली होती.

**५. पाचवी पंचवार्षिक योजना (१९७२ ते १९७७) :**

पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात प्रौढ शिक्षणाचा समावेश प्राथमिक शिक्षण, आरोग्य, सहकार, कुटुंब नियोजन इत्यादी सर्व राष्ट्रीय विकासात्मक कार्यक्रमात करण्यात आला. शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणाचा व कार्यात्मक साक्षरतेचा विस्तार केला गेला.

**६. सहावी पंचवार्षिक योजना (१९८० ते १९८५) :**

सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात देशातील सर्व नागरिकांना मूलभूत शिक्षण देण्याची योजना आखण्यात आली. या योजनेत साक्षरतेबरोबरच आर्थिक विकासाला उपयुक्त ठरतील, अशा कौशल्यांचा विकास करण्याचे ठरले. वयोगट १५ ते ३५ साठी अनौपचारिक शिक्षणाच्या उपयोग करण्यात आला. प्रसार माध्यमे आणि वाचन साहित्य यावर भर देण्यात आला.

**7. सातवी पंचवार्षिक योजना (१९८५ ते १९९०) :**

सातव्या पंचवार्षिक योजनेत १५ ते ३५ वयोगटावर लक्ष केंद्रित करण्यात आले. स्वयंसेवी संघटनांना अधिक स्वातंत्र्य देण्यात आले. जनशिक्षण निलायम केंद्र उघडण्यात आले. प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमाला स्थायी स्वरूप देण्याचा प्रयत्न सुरू झाला. या योजनेच्या काळात मनुष्यबळाच्या विकासावर लक्ष केंद्रित करून नवे तंत्रज्ञान आणि विकासाचे अभिनव प्रयोग यावर भर देण्याचे ठरले.

**सारांश :**

प्रस्तुत संशोधन लेखनामधून भारतातील प्रौढ शिक्षणाचा धावता आढावा घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने भारतामध्ये प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळात प्रौढ शिक्षण कशा प्रकारे चालत असे, याचा अभ्यास केलेला आहे. प्राचीन काळी विद्येला खूपच महत्त्व देण्यात येत होते. ज्यांच्याकडे विद्या नाही तो पशु समान आहे, असे समजले जात असे. प्राचीन काळामध्ये प्रौढ शिक्षण हे घराघरातून चालत असे. कुटुंबातील निरक्षर व्यक्तींना त्याच कुटुंबातील साक्षर व्यक्ती शिक्षण देत असे. प्राचीन काळातील शिक्षण यात प्रामुख्याने अक्षरज्ञान, प्रारंभिक गणित, भूगोल, इतिहास, धर्म, पुराण, संस्कृतीचा समावेश होता. तसेच प्रगत शिक्षणाबरोबर घरातील व्यावहारिक शिक्षण व घरात चाललेल्या व्यवसायाचे शिक्षण दिले जात असे.

मध्ययुगीन काळात मंदिरा-मंदिरातून देवळातून, विहारातून शिक्षण दिले जात असे व धर्मगुरू शिक्षण देत असत. आधुनिक काळात प्रौढ शिक्षण हे अनेक सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून दिले जाते. इ.स. १८५५ साली महात्मा फुले यांनी आपल्या घरी प्रौढांना शिक्षण देण्यासाठी वर्ग भरविले. तसेच महात्मा फुले यांनी स्त्रियांसाठी

रात्रशाळा देखील सुरू केल्या. या काळात शेतात काम करणाऱ्या मजुरांना त्यांच्या विश्रांतीच्या वेळी शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली.

बंगाल प्रांतात ज्या शाळा चांगल्या चालतात, त्या शाळांना रात्रीचे प्रौढांचे वर्ग जोडले जात असत. कलकत्ता येथे एका कारखान्यात प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालविण्यात येत होता.

इ.स. १९२० साली पंजाब मध्ये गुरगाव येथे इंग्रज शासकीय अधिकारी बेन यांनी प्रौढ शिक्षणात महत्त्वाचे काम केले आहे. आंध्रप्रदेशात 'हेडमपल्ली मुंडम' या खेडेगावी खेडे सुधार शाळा हा उपक्रम चालविण्यात येत होता. या शाळा तर्फे प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात येत असे.

त्यानंतर भारतातील पंचवार्षिक योजनेत देखील प्रौढ शिक्षणाची विशेष अशी योग्य तरतूद प्रत्येक पंचवार्षिक योजनेत करण्यात आली आणि प्रौढ शिक्षण कार्यक्रम मोहीम मोठ्या प्रमाणावर यशस्वी करण्यात आली.

**संदर्भसूची**

1. करंदीकर, सु. अ., 'प्रौढ शिक्षण' (१९९३), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. पृष्ठ क्रमांक ४.
2. देशपांडे, के. ना., 'प्रौढ व निरंतर शिक्षण' (१९९३), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. पृष्ठ क्रमांक १४.
3. दळवी, म. अ., 'डायमंड सामाजिक ज्ञानकोष'' (२००७), नागपूर ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.
4. सोहोनी, बा. वि., 'प्रौढ शिक्षण' (१९९३), नूतन प्रकाशन, पुणे.
5. जोगळेकर, र. अ., 'प्रौढ शिक्षण' (१९९२), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.